## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ६६४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०९/२०१७

**१) जुण्या वादावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने ठार मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २३/०९/२०१७ चे ११.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी सामाईक इरादयाने फिर्यादीला जुण्या वादावरुन त्याचे कडे पाहुन हात इशारे करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तुला जिवानीशी मारल्या शिवाय राहणार नाही तेव्हा माझ्या आत्म्याला शांती मिळणार नाही असे बोलल्याने फिर्यादी प्रमोद वसंत लिचडे वय ३८ वर्ष, रा. कोथुर्ना यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रायपुरकर पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २२/०९/२०१७ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपल्या घरी जेवन करुन आपल्या पती सोबत घरी बसती असतांना यातील आरोपीतांनी फिर्यादी व तिचे पतीचे नाव घेवुन शिवीगाळ केली असता, फिर्यादीचे पतीने आरोपीला शिवीगाळ का करतेस? असे हटकले असता फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिऱ्हेपुंजे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणा वरुन शिवीगाळ करुन लोखंडी सलाख डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २३/०९/२०१७ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नुरबेक इस्मॉईल बेग वय ३१ वर्ष, रा. चिचाळ ह. मु. वळोदा जिल्हा नागपुर याने आरोपीचे आईस तुम्ही आपली बैलबंडी, रेती, गिट्टी आमचे जागेत ठेवली आहे. त्यामुळे आम्हाला अडचण होते असे म्हटले असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन व ढकलढुकल करुन आरोपी क्र. १ ने आपले घरुन लोखंडी सलाख आणुन फिर्यादीच्या डोक्यावर उजवे बाजुला मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२४,५०४,३४ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) घरात अनाधिकृतपणे प्रवेश करुन जागेच्या वादावरुन कुऱ्हाडीच्या दांडयाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २२/०९/२०१७ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी गरीबा धरमा भांडाराकर वय ४५ वर्ष, रा. पिंळकेपार व आरोपी हे सख्खे काके पुतने असुन घराचे जागेच्या वादा वरुन यातील आरोपीने हातात कुऱ्हाड घेवुन फिर्यादीचे घरी जावुन अन्यायाने गृह प्रवेश करुन दार ढकलुन आत प्रवेश करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन ढकल ढुकल केले व फिर्यादीस कुऱ्हाडीच्या दांडयाने उजव्या खांदयावर मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,४५२,५०४ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**५) ट्रेलरच्या धडकेत दोघांचा मृत्यु :—**

दिनांक २३/०९/२०१७ चे ०६.४५ वाजता दरम्यान यातील मृतक क्र. १) समृती उर्फ सोनु अनिल कानेकर वय २० वर्ष, रा. मानेगाव सडक क्र. २) श्रीकांत विनोद कांबळे वय २२ वर्ष, रा. शिवनी मोगरा हे दोघेही डब्बल सिट बसुन हिरो होंडा डिलक्स मोटार सायकल एमएच ३६ ई. सी ०००२ नी साकोली कडुन नागपुर कडे एनएच ०६ रोडने जात असतांनी मानेगाव सडक येथे मागेहुन येणाऱ्या आरोपी ट्रेलर चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकला मागेहुन धडक दिल्याने दोघांच्याही मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी अरुण तुकाराम कानेकर वय ४९ वर्ष, रा. मानेगाव सडक यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३०४(अ) भांदवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. चकाटे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**६) मोटार सायकलची चोरी. :—**

दिनांक २२+२३/०९/२०१७ चे रात्र. दरम्यान यातील फिर्यादी आनंद वासुदेव दुरुगकर वय २३ वर्ष, रा. मुरमाडी सावरी यांनी दिनांक २२/०९/२०१७ चे रात्री दरम्यान घरासमोर रोडवर आपली हिरो होंडा स्पलेन्डर मोटार सायकल क्र. एमएच ३६ सी ३४९३ किंमती २२,०००/—रु. ची ठेवलेली काणेतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**७) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोन जखमी . :—**

दिनांक २३/०९/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील जखमी योगेश महादेव कुथे वय ५५ वर्ष, रा. गडेगाव हा लाखनी वरुन गडेगाव कडे आपले सायकलने येत असता त्यास पंचायत समिती लाखनी समोर एनएच ६ रोडवर विरुध्द दिशेने भंडारा कडुन साकोली कडे जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळजीपने चालवुन सायकल स्वारास धडक मारुन जखमी केले व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी विलास परसराम बाभरे वय ४० वर्ष, यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**८) दारु पिवुन दारुचे नशेत वाहन चालवुन मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०९/२०१७ चे ००.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने दारु पिवुन दारुच्या नशेत एनएच ०६ रोडने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने मानवी जिवीतास धोका होईल असे बेकादेशीरपणे वाहन चालवितांना मिळुन आल्याने डॉ. एमएलसी रिपोर्ट वरुन व सरतर्फे फिर्यादी सपोनी नेवारे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९ भांदवी. सहकलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**९) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे वाहनाचे व मालाचे तसेच एका इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०९/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी चंद्रलाल देवराम चिचमलकर वय ४५ वर्ष, रा. शेन्द्रीखुर्द ता. पवनी हे आपले वाहन क्र. एमएच ३६ एफ १९५८ ने चालकासह गाडी मध्ये भाजीपाला घेवुन नागपुर कडुन भंडारा कडे येत असतांनी पेट्रोलपंप ठाणा उडान पुलाजवळ एनएच ६ रोडने मागेहुन येणारे यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मागेहुन धडक मारल्याने वाहनाचे व मालाचे अंदाजे २,००,०००/—रु. ची नुकसान केली व रोडाने जाणाऱ्या सायकल स्वार ईस्तारी सुर्यभान आकरे वय ४५ वर्ष, रा. खरबी हयास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८ भांदवी. सहकलम १८४ ,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आडे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**१०) अवैध दारू /जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक २३/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, कारधा, वरठी, तुमसर, सिहोरा आंधळगाव, गोबरवाही, साकोली व लाखांदुर येथे अवैध दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १४ गुन्हे दाखल करून ६६ लिटर हा.भ. दारू+ २५० किलो ग्रॅम सडवा मोहा किंमती १४,६९०/–रु, व ८३ लिटर ५२० मिली लिटर देशी, विदेशी दारु+ १मारोती +१ मोटार सायकल किंमती १,९५,६००/–रु. तसेच जुगारातुन किमती २८७०/रु असा एकुण किंमती २,१३,१६०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

सपोनी. पी. के. बोरकुटे
पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.९६५७४०७१७३

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.